म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल. वा.
दा. क्र. ५४८५



IRBK-0105485
IRBK-0105485

# [illegible]पूजींच्या गोड गोष्टी

— साने गुरुजी

साधना प्रकाशन ५.

# बापूजींच्या गोड गोष्टी

## भाग पांचवा

लेखक

**साने गुरुजी**

IRBK-0105485
IRBK-0105485

साधना प्रकाशन, ३ … पुणें २.

किंमत सहा आणे

# दोन शब्द

साने गुरुजींनीं १९४८ सालीं मुंबईहून ' **कर्तव्य** ' हें सायं–दैनिक सुरू केलें होतें. त्या दैनिकांत गुरुजी नियमानें गांधीजींच्या जीवनांतील वेंचक प्रसंगांच्या कथा देत असत. त्या कथांच्या जोडीला आणखी भर घालून बापूजींच्या गोड गोष्टींचे हे सहा भाग गुरुजींनीं तयार केले. या सहा भागांत मिळून १२२ गोष्टी दिलेल्या आहेत.

या गोड गोष्टी सांगतांना जाणूनबुजून गुरुजींनीं विषयानुक्रम किंवा कालानुक्रम ठेवला नव्हता. गांधीजींचें विविधरंगी, विविधगंधी मंगल दर्शन व्हावें या दृष्टीनें या पुस्तकांची रचना करण्यांत आली आहे. मुलांना विविधतेंत मौज वाटतें म्हणून ही अशी मोकळी रचना.

सहाहि भागांची पुनर्मुद्रणें काढण्याचें भाग्य ' साधना प्रकाशन 'ला लाभलें, हा कथाविषय आणि कथालेखक यांचा महिमा आहे. गांधीजींच्या भक्तिप्रेमानें ओथंबलेल्या साने गुरुजींच्या भावप्रधान लेखणींतून उतरलेल्या ह्या प्रेरक प्रसंगकथा आहेत. These little things are great to little men ह्या छोट्या गोष्टी छोट्यांच्या जीवनाच्या दृष्टीनें भारी मोलाच्या आहेत.

पहिल्या आवृत्त्यांप्रमाणेंच हीं पुनर्मुद्रणेंहि सर्वत्र जावोत.

—**प्रकाशक**

तिसरी आवृत्ति : जानेवारी १९५६ : सर्व हक्क स्वाधीन

प्रकाशक : **यदुनाथ थत्ते**, साधना प्रकाशन, ३७४ शनिवार पेठ, पुणें २.
मुद्रक : **चिं. ग. घड्शे**, साधना प्रेस, ३७४ शनिवार पेठ, पुणें २.

# बापूजींच्या गोड गोष्टी

## चौथ्या भागावरून पुढें सुरू

### ७६

पांचव्या भागाचा हा आरंभ. आरंभीं लहान मुलाचीच एक गोष्ट सांगतों. कारण लहान मुलें म्हणजे देवाचें रूप. त्यांचें मन निर्मळ, हृदय निर्मळ. बापूजींना लहान मुलें फार आवडायचीं.

एकदां बापूजी आपलें खाणें घेत होते. ते तर मोजून खायचे. पांच पदार्थांहून अधिक घ्यायचे नाहींत. त्या दिवशीं कोणी तरी द्राक्षें वगैरे फळांची भेट आणून दिली होती. भेटीचीं फळें सर्वांना वांटलीं जात. सेवाग्रामला बापू असले म्हणजे भेटीचीं फळें आधीं जे कोणी आजारी असतील त्यांना मिळायचीं.

गांधीजी आहार घेत होते. फळें खात होते. इतक्यांत कोणी मंडळी भेटायला आली. तें एक प्रेमळ कुटुंब होतें. आईबाप, लहान मुलगा, सारी मंडळी आली. गांधीजींना प्रणाम करून

सारीं बसलीं. त्या मुलानें बापूंकडे पाहिलें. तो आईजवळ कांहीं तरी म्हणूं लागला. आई त्याला दटावीत होती.

" वेडे आहेत गांधीजी. होय, वेडेच आहेत " तो बाळ म्हणाला.

" असें म्हणूं नये. गप्प " आई रागानें म्हणाली.

" वेडेच आहेत " तो पुन्हा म्हणाला.

" मार हवा का " आई रागानें बोलली. गांधीजींचें लक्ष गेलें. आपल्या चष्म्यांतून त्यांनीं हंसत पाहिलें.

" काय म्हणतो तो ? काय रे बाळ ? " त्यांनीं विचारलें.

" वेडे आहांत तुम्ही " मुलगा म्हणाला. आईबापांची व इतरांचीं तोंडें काळवंडलीं. परंतु तो राष्ट्राचा पिता मोठ्यानें हंसला.

" कां रे मी वेडा ? सांग तर खरें " बापू हंसून म्हणाले.

" तुम्ही एकटे एकटे खातां. कोणाला देत नाहीं. आई मला एकदां म्हणाली होती 'एकटा खातोस, वेडा आहेस. दे त्या मुलाला ' आणि तुम्ही तर एकटे खात आहांत. म्हणून वेडे ! "

" होय. खरें हो. हीं घे तुला फळें. आतां झालों ना मी शाहणा ? घे."

" मला नकोत जा."

" कां ? "

"आई म्हणते दुसऱ्यानें दिलेलें घेऊं नये."

"अरे एकदम नये घेऊं. परंतु आग्रह केल्यावर घ्यावें. घे."

आईबापांनीं सांगितल्यावर त्या मुलानें फळें घेतलीं. सर्वांना हंसू आलें. गंमतीची गोष्ट, नाहीं?

• • •

## ७७

१९३० मधील एप्रिल महिना. दांडी यात्रा संपली होती. मिठाचा सत्याग्रह गांधीजींनीं केला होते. ते आतां शिंदीचीं झाडें तोडण्याचा सत्याग्रह करीत होते. कराडी गांवीं मुक्काम होता. ती पाहिलीत लहानशी झोंपडी? त्या झोंपडींत महात्माजी रहातात.

एके दिवशीं सकाळीं निराळाच प्रकार दिसला. गांवकऱ्यांनीं मोठी मिरवणूक काढली होती. स्त्रियाहि मिरवणुकींत होत्या. त्या सर्वांच्या पुढें होत्या. अग्रभागीं राष्ट्रध्वज होता. वाद्यें वाजत होतीं. कशासाठीं होती ती मिरवणूक? ती सारी मंडळी का सत्याग्रह करणार होती? पुरुष मंडळीच्या हातांत फुलें, फळें, पैसे आहेत. काय आहे प्रकार?

महात्माजी बाहेर आले. एकच जयजयकार झाला. त्या सर्वांनीं भक्तिभावानें प्रणाम करून आणलेल्या भेटी गांधीजींच्या चरणांवर वाहिल्या.

" कां आलांत ? कां हीं वाद्यें ? " बापूनीं विचारलें.

" महात्माजी, आमच्या गांवाला नेहमीं पाण्याचा दुष्काळ. उन्हाळा आला कीं विहीरी आटायच्या. पाण्याचा खडखडाट. परंतु काय आश्चर्य ? बापू, तुमचे पाय आमच्या गांवाला लागले आणि देवा विहीर पाण्यानें भरून आली. मग आमचीं हृदयें भक्तिभावानें कां बरें भरून येणार नाहींत ? " पुढारी म्हणाले.

" वेडे आहांत तुम्ही. माझ्या येण्याचा त्या पाण्याशीं काय संबंध ? ईश्वरावर का माझी सत्ता आहे ? त्याच्यापाशीं तुमच्या शब्दाला जेवढें महत्त्व तेवढेंच माझ्या. असें कांहीं वेड्यासारखें बोलूं नका " गांधीजी कठोरपणानें बोलले.

परंतु थोडा वेळ गेला. राष्ट्राचा पिता हंसला नि म्हणाला : " हें बघा, झाडावर कावळा बसायला नि झाड मोडायला एक वेळ आली तर का तें झाड कावळ्यानें मोडलें असें म्हणाल ? दुसरीं शेकडों कारणें असतात. तुमच्या विहिरीला पाणी आलें, पृथ्वीच्या पोटांत कांहीं घडामोड झाली असेल नि नवीन झरा फुटला असेल. खरें ना ? उगीच बावळट कल्पना मनांत आणीत नका जाऊं. आणि सारे सूत कातायला लागा आधीं. भारत मातेला कपडा हवा ना ? "

सारी जनता प्रणाम करून गेली. हातांत धारदार कुऱ्हाड घेऊन राष्ट्राचा तात, तो महान् सत्याग्रही शिंदीचीं झाडें तोडायला बाहेर पडला.

• • •

## ७८

१९३० मधील ते तेजस्वी दिवस. अजून सत्याग्रह सुरू झाला नव्हता. अजून ती महान् दांडी-यात्रा सुरू झाली नव्हती. देशांत सर्वत्र अपेक्षेचें वातावरण होतें. २६ जानेवारीचा पहिला स्वातंत्र्यदिन देशभर पाळला गेला होता. गांधीजी कोणती आज्ञा करतात, कशा रीतीनें सत्याग्रह करा सांगतात, इकडे जनतेचें लक्ष होतें. ठायीं ठायीं शिबिरें सुरू झालीं होतीं. स्वयंसेवक येऊं लागले होते. मिठाचा सत्याग्रह देशभर करायचा, परंतु मी सांगितल्याशिवाय नाहीं करायचा, आधीं दांडीला मी करीन मग सर्वत्र करा, असें गांधीजींनीं सांगितलें होतें.

महात्माजी एक महत्त्वाचें पत्र लिहीत आहेत. ऐतिहासिक पत्र. देशाचें भवितव्य ठरवणारें पत्र. कोणाला लिहित होते तें पत्र ? दिल्लीच्या लाट साहेबांना, व्हाइसरॉय साहेबांना.

तें पत्र लिहून झालें. आणि लगेच दुसरें एक पत्र त्यांनीं लिहायला घेतलें ? तें कोणाला होतें ? इंग्लंडमधील मुख्य प्रधानाला ? अमेरिकेच्या अध्यक्षाला ? कोणाला होतें तें ? त्या वेळच्या काँग्रेसच्या अध्यक्षांना, पंडित जवाहरलाल नेहरूंना ? कीं सत्याग्रहाचा मार्ग सांपडला का असें नुकतेंच आश्रमांत येऊन विचारून गेलेल्या रवीन्द्रनाथांना ? कोणाला होतें तें पत्र ?

तें पत्र एका हरिजन मुलीला होतें. ५०० मैल दूर ती रहात होती. तिला होतें तें प्रेमळ पत्र.

" तुझें बोट दुखावलें आहे. परंतु त्याला आयडीन लावतेस का ? तें लावित जा " अशी वत्सल सूचना राष्ट्रपिता त्या मुलीला त्या पत्रांतून देत होता. एकीकडे राष्ट्रव्यापी लढा डोळ्यासमोर, तें व्हाइसरायांना पत्र, तर दुसरीकडे त्या दूरच्या मुलीला तें प्रेमळ पत्र. महापुरुषांना सारें सारखें.

• • •

## ७९

हिंदुस्थानची नवीन घटना होत होती. लौकरच ती पुरी झाली. पंडित जवाहरलाल तर अधीर झाले होते. घटना मंजूर झाली कीं भारताला " लोकसत्ताक राष्ट्र " म्हणून ते घोषवणार होते.

आज राष्ट्रपिता नाहीं. परंतु भारताची घटना आज ना उद्यां पुरी होणार आणि हिंदुस्थान हें लोकसत्ताक सार्वभौम राष्ट्र होणार हें ते जाणत होते. लोकसत्ताक राष्ट्रांत नवीन घटनेनुसार कोणीतरी अध्यक्ष निवडला जाईल. स्वतंत्र हिंदचा पहिला अध्यक्ष ! कोणाला मिळणार तो मान ? कोणालाहि मिळो.

या राष्ट्राचा कोण पहिला अध्यक्ष व्हावा म्हणून महात्माजींना वाटत होतें ?

दिल्लीला भंगी वस्तींत त्या दिवशीं सभा होती. हरिजन वस्तींत आज सायंप्रार्थना, तेथेंच प्रार्थनोत्तर प्रवचन. त्या प्रवचनांतील ते थोर उद्गार तुम्हांला सांगूं ? दिल्ली डायरींत ते आहेत. महात्माजी म्हणाले : " एखाद्या भंग्याची मुलगी या राष्ट्राची पहिली अध्यक्ष व्हावी अशी मला तहान आहे !" पददलित पुढें यावेत म्हणून केवढी ही तळमळ ! मला ते उद्गार वाचून पैगंबरांच्या अशाच उद्गारांची आठवण होत असते. एका इराणी गुलामाला पैगंबरानीं स्वतंत्र केलें होतें. ते म्हणाले : " माझ्यामागून यानें खलिफा व्हावें असें वाटतें ! " जो कालपर्यंत गुलाम होता, तो सर्व मुसलमानांचा प्रमुख व्हावा ही पैगंबरांची इच्छा, तर भंग्याची मुलगी हिंदची पहिली अध्यक्ष व्हावी ही गांधीजींना असोशी ! थोर ते थोर. ते कोठेंहि जन्मोत.

• • •

## ८०

१९२१ मध्येंच बारडोलीचा लढा व्हायचा होता. परंतु तो पुढें १९२८ मध्यें झाला. १९२१ मध्यें कां बरें नाहीं झाला ? तयारी तर झाली होती. देशव्यापक सत्याग्रह सुरू करण्याआधीं

महात्माजी एका तालुक्यांत प्रयोग करणार होते. तेथें स्वराज्य जाहीर करणार होते. सरकार मानायचें नाहीं ठरविणार होते. त्यासाठीं बारडोली तालुका त्यांनीं पसंत केला होता. देशभर विजेसारखें वातावरण होतें. ब्रिटिश सत्तेला न मानण्याचा सामुदायिक प्रयोग !

देशबंधु चित्तरंजनदास तुरुंगांत होते. स्वयंसेवक संघटना बेकायदा ठरवण्यांत आली होती. हजारों तरुण तुरुंगांत होते. चंद्रशेखर आझाद माहीत आहेत ना ? अलाहाबादच्या बागेंत पोलीसांजवळ लढतांना जो पुढें हुतात्मा झाला, तो १९२१ मध्यें केवळ १५ वर्षांचा तरुण. परंतु त्या वेळेस त्याला फटके मारण्यांत आले आणि बाळ चंद्रशेखर प्रत्येक फटक्यास महात्मा गांधी की जय गर्जे ! असें तें १९२१ हें वर्ष.

परंतु देशांत विजेचें वातावरण असतांना युक्तप्रांतांत चौरीचुरा येथें दंगे झाले. पोलीस वगैरे जाळले गेले. लोक प्रक्षुब्ध झाले आणि महात्माजी व्यथित झाले. बारडोलीचा लढा यशस्वी व्हायला हवा असेल तर साऱ्या राष्ट्रानें शांत राहिलें पाहिजे, अत्याचार कोठें होतां कामा नये, असें महात्माजी निक्षून सांगत होते. बारडोलीच्या लढ्याविषयीं व्हाइसरायांना त्यांनीं पत्र लिहिलें होतें. परंतु चौरीचुऱ्याची बातमी आली. गांधीजींनीं लढा बंद ठेवला. "चौरीचुरा धोक्याची निशाणी आहे. देश शान्ति राखूं शकणार नाहीं. मी लढा नाहीं सुरू करतां कामा" अशा आशयाचें गांधीजींनीं लिहिलें. तें कठोर आत्मपरीक्षण

नि राष्ट्रपरीक्षण होतें. विद्युन्मय राष्ट्र गांधीजींचा निर्णय ऐकून हताश झालें. केसरी पत्रानें : “ बारडोलीचा बार फुकट गेला ” म्हणून अग्रलेख लिहिला. राष्ट्राचा तेजोभंग करणें पाप असें कोणी म्हणाले. देशबंधु तुरुंगांत रागानें लाल झाले. गांधीजींची घोडचूक असें ते म्हणाले. परंतु महापुरुष शान्त होता. गांधीजी अविचल राहिले.

एकदां गांधीजींना कोणी विचारलें : “ तुमच्या आयुष्यांतील सर्वांत महत्त्वाचा दिवस कोणता? कोणता दिवस तुम्हांला मोठा वाटतो? ” ते म्हणाले : “ सारें राष्ट्र विरोधी असतां बारडोलीचा लढा ज्या दिवशीं मी मागें घ्यायचा ठरविलें, तो दिवस मी मोठा मानतों. माघार घेण्याचा तो दिवस, परंतु तो सत्याग्रहीच्या दृष्टीनें विजयाचा होता. अहिंसेचा तो विजय होता ! ”

जनतेला जो दिवस पराजयाचा वाटला तो महात्माजींना विजयाचा वाटला ! नाथांच्या घरची उलटी खूण !

## ८१

१९२२ च्या मार्च महिन्यांत महात्माजींना शिक्षा झाली. बारडोलीचा लढा मागें घेतल्यावर अटक करण्याची जरूरी नव्हती. परंतु लढा मागें घेतल्यामुळें गांधीजींविषयीं लोक आणि

लोकनेते नाराज आहेत असें पाहून सरकारनें त्या तेजःसूर्याला तुरुंगांत कोंडायचें ठरविलें. महात्माजींनीं गुन्हा कबूल केला. " या राज्याविरुद्ध अप्रीति उत्पन्न करणें माझा धर्म " असें म्हणाले. आणि लोकमान्यांना पूर्वीं सहा वर्षांची शिक्षा दिलेलें उदाहरण डोळ्यांसमोर आणून न्यायमूर्तींनीं गांधीजींनाहि सहा वर्षांची शिक्षा दिली. सहा वर्षें राष्ट्राचा तात दिसणार नव्हता. महादेवभाई रडूं लागले. खटल्याच्या वेळेस तात्यासाहेब केळकर अमदाबादला मुद्दाम गेले होते. ते महादेवभाईना शान्त करीत होते. " लोकमान्यांना शिक्षा झाली तेव्हां आम्हांलाहि असेंच रडूं आलें " सांगून ते महादेवभाईना धीर देत होते. गंभीर, हृदयद्रावक प्रसंग.

परंतु बंगालमधील एका खेडेगांवांतील एका वाड्याच्या देवडीवर असणारा हा पहारेकरी कां बरें रडत आहे ? त्या वाड्यांत एक थोर क्रान्तिकारक रहात होता. मला वाटतें उल्हासकर दत्तच. त्यांची सुटका झाली होती. त्यांना जरा वेड लागल्यासारखें झालें म्हणून सरकारनें सोडलें होतें. ते त्या वाड्यांत रहात. त्यांची स्मृति पुन्हां सतेज होत होती. भ्रमिष्टपणा नष्ट होत होता.

तो देवडीवाला रडत होता. त्याच्या हातात एक बंगाली वृत्तपत्र होतें.

" कां रडतोस ? " क्रान्तिकारकानें त्याला विचारलें.

" माझ्या जातीच्या एका माणसाला देशासाठीं सहा वर्षांची शिक्षा झाली. म्हातारा आहे तो. चौपन पंचावन वर्षांची त्याची उमर. या पत्रांत आहे बघा."

त्या वृत्तपत्रांत गांधीजींच्या त्या ऐतिहासिक खटल्याची हकीगत होती. गांधीजींनीं आपली जात शेतकरी, धंदा विणकराचा असें सांगितलें होतें. तो पहारेकरी मुसलमान होता. विणकराची त्याची जात. तें वाचून त्याचे डोळे भरून आले होते.

त्या थोर क्रान्तिकारकाच्या सारें लक्षांत आलें. तो आपल्या आठवणींत लिहितो : " आम्ही कसले क्रान्तिकारक ? खरे क्रान्तिकारक गांधीजी होते. साऱ्या राष्ट्राशीं ते एकरूप झाले होते. मी शेतकरी, मी विणकरी, हे त्यांचे शब्द राष्ट्रभर गेले असतील. आपल्यांतील कोणी तरी तुरुंगांत चालला असें कोट्यवधींना वाटलें असेल. जनतेशीं जो एकरूप झाला, जनतेशीं ज्यानें संबंध जोडला, तोच परकीयांचा बंध तोडूं शकतो. प्रणाम या खऱ्या महान् क्रान्तिकारकाला ! "

• ० •

## ८२

ईश्वरावर श्रद्धा ही एक जिवंत गोष्ट आहे. तुकाराम महाराजांनीं म्हटलें आहे : " प्राण गेला तरी निष्ठा जातां नाहीं कामा."

" तुका म्हणे व्हावी प्राणांसवें ताटी
नाहीं तरी गोष्टी बोलूं नये "

देवाविषयीं, श्रद्धेविषयीं उगीच कशाला बोलतां ? प्राणांची ताटातूट झाली तरी बेहत्तर अशी तयारी असेल तर अशा गोष्टी बोला. तुकारामांचे हे शब्द खरे आहेत.

गांधीजींची ईश्वरावर अशीच निष्ठा होती. तो तारणारा, तो मारणारा. साबरमतीचा आश्रम नुकताच सुरू झाला होता. आश्रमांत कोणी हरिजन आले तर त्यांनाहि घेऊं ते म्हणाले. आणि एक हरिजन कुटुंब आलें. महात्माजींनीं त्यांना घेतलें. अहमदाबादची सनातनी मंडळी रागावली. व्यापारी लोक मोठे धर्मिष्ठ. आश्रमाला मदत कोण देणार ?

महात्माजींचे पुतणे मगनलाल आश्रमाची व्यवस्था ठेवणारे. दक्षिण आफ्रिकेपासून महात्माजींच्या साधनेंत ते समरस झालेले. महात्माजी त्यांना आपला उजवा हात म्हणत. महात्माजींना चरका हवा होता. तर मगनलाल गुजरातभर हिंडले. सूत कांतणारी भगिनी दिसतांच ते आनंदानें वेडे झाले. रेंटिया सांपडला. असे मगनलाल. ते एके दिवशीं सायंकाळच्या प्रार्थनेनंतर बापूंना म्हणाले : " बापू, उद्या आश्रमांत खायला कांहीं नाहीं. पैसे तर शिल्लक नाहींत. काय करायचें ? "

" चिंता नको करूं. प्रभूला काळजी आहे. ' योगक्षेमं वहाम्यहम् ' असें त्यानें म्हटलें आहे " बापू शान्तपणें म्हणाले.

आणि त्या दिवशीं रात्रीं कोणी व्यापारी आला. त्यानें आश्रम पाहिला. आणि दहा हजार रुपये तो देऊन गेला!

एकदां कोणी तरी गांधीजींना प्रश्न केला : "तुम्ही स्वतःचा विमा कां नाहीं उतरीत?"

"परमेश्वरावर श्रद्धा आहे म्हणून" ते म्हणाले.

• • •

## ८३

श्री. घनश्यामदास बिर्ला आणि गांधीजी यांचे फार जिव्हाळ्याचे संबंध. बिर्लांनीं 'बापू' म्हणून सहृदय पुस्तकहि लिहिलें आहे. एकदां बिर्लांना बरें नव्हतें. बापूंनीं त्यांना लिहिलें : "सेवाग्रामला या. उपाय करतों." गांधीजी जन्मजात वैद्य. राजेन्द्रबाबू, सरदार, नरेन्द्रदेव, कितीकांची तरी ते सेवाग्रामला शुश्रूषा करायचे, उपाययोजना करायचे. सर्वांविषयीं त्यांचा समभाव. महान् नेता असो, भांडवलदार असो, लहान बालक असो. कोणत्याहि पक्षाचा असो. त्यांचें प्रेम, त्यांचा स्नेह सर्वांसाठीं. सूर्याचे किरण राजवाडा असो वा झोंपडी असो, सर्वत्र समभावानें पडतात.

महात्माजी बिर्लांना बोलावित होते परंतु बिर्ला संकोचत होते. सेवाग्रामला भंगी नाहींत. आश्रमीय मंडळीच सारें

भंगीकाम करणार. आणि बिर्ला जेथें राहणार, त्या भागांतील स्वच्छता, तेथील आरोग्य याची जबाबदारी महादेवभाईवर असणार. बिर्लांना भंगीकाम आवडत नसे. आणि आपलें भंगी-काम महादेवभाईंना करायला लागावें हा विचार त्यांना सहन होत नव्हता. म्हणून ते सेवाग्रामला येत ना.

परंतु गांधीजींची नि त्यांची गांठ पडली.

“ या ना सेवाग्रामला. तुम्हाला बरा करतों. माझे उपाय सुरू करतों ” बापू म्हणाले.

बिर्लांनीं आपली अडचण सांगितली.

“ भंगीकाम का वाईट? कितना अच्छा काम! ” महात्माजी म्हणाले.

महादेवभाईंना हंसू आलें. गांधीजीहि हंसले. परंतु गांधीजी कोणावर लादीत नसत. दुसऱ्याची भावना ते ओळखीत, त्या भावनेची कदर करीत.

“ तुम्ही या. तुमच्यासाठीं एक भंगी कांहीं दिवस नेमूं ” बापू म्हणाले.

आणि बिर्ला आले. कांहीं दिवस एका खास भंग्याची योजना करण्यांत आली. असे होते सर्वांना सांभाळणारे बापू!

• • •

# ८४

१९३१ मध्यें दिल्लीला गांधी-आयर्विन करार झाला. सत्याग्रह विजयी झाला होता. ब्रिटिश सरकारनें हिंदजवळ आपण होऊन केलेला तो पहिला करार. गांधीजींनीं लंडनला गोलमेज परिषदेला जाण्याचें कबूल केलें होतें. आणि ते निघाले. ती पहा मुंबईहून बोट निघाली. निघतां निघतां एका लहान मुलाचा गांधीजी पापा घेत आहेत. फोटोग्राफर फोटो घेत आहेत. निघाली बोट.

आज बोट एडनला पोंचायची होती. एडनची हिंदी नि अरब जनता महात्माजींना मानपत्र आणि थैली देणार होती. परंतु त्या समारंभाच्या वेळीं तिरंगी झेंडा फडकवायला तेथील पोलिटिकल रेसिडेंट परवानगी देईना.

गांधीजी स्वागत मंडळाच्या अध्यक्षांस म्हणाले : "रेसिडेंट साहेबांस फोन करा नि सांगा कीं हिंदुस्थान सरकारजवळ कॉंग्रेसचा करार झाला आहे. अशा वेळेस तरी तुम्ही राष्ट्रध्वजाला नकार देऊं नये. परंतु तुम्ही परवानगी देत नसाल तर मी मानपत्र घेणार नाहीं." फोन करण्यांत आला. पोलिटिकल एजन्टानें नाजूक परिस्थिति ओळखून परवानगी दिली. तिरंगी झेंडा एडनला फडकला. लाल नि अरबी समुद्रानें तो पाहिला.

गांधीजी मानपत्राला उत्तर देतांना म्हणाले : "ज्या

राष्ट्रध्वजासाठीं हजारों लढले, मेले, तो ध्वज राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधींच्या स्वागतासाठीं नसून कसा चालेल? राष्ट्रीय ध्वजाला परवानगी द्यायचा हा प्रश्न नाहीं. परंतु जेथें राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधि बोलावण्यांत येतील तेथें तिच्या ध्वजासहि सन्मान्य स्थान असलें पाहिजे."

तेथील हिंदी नि अरब जनतेला किती आनंद झाला! त्या बोटींतलि शेंकडों गोरे लोक तो प्रसंग पहात होते.

• • •

## ८५

एडनला हा सन्मान-समारंभ घडला. परंतु येथलीच ती दुसरी गोष्ट. येथूनच महात्माजींनीं बरोबरचें कांहीं सामान हिंदुस्थानला परत पाठवलें. मुंबईहून बोट सुटल्यावर गांधीजी सामान पाहूं लागले. किती तरी सामान!

"महादेव, या पेट्यांतून काय आहे? इतकें सामान कसें जमलें?" बापूंनीं विचारलें.

"विलायतेंत थंडी फार. म्हणून अनेकांनीं कपडे दिले आहेत. रग आहेत. गरम कपडे आहेत. नाहीं कसें म्हणायचें! ही एक काश्मीरी शाल आहे" महादेवभाई अजीजीनें सांगत होते.

" इतके कपडे घेऊन आपण कसें जायचें? दरिद्रनारायणाचे प्रतिनिधि म्हणून ना आपण जात आहोंत? हीं वस्त्रें, प्रावरणें पाहून आपणांस गरीब कोण म्हणेल? मला तर कपडे लागणार नाहींत. फारच थंडी पडली तर धाबळी पुरे. तुम्हांला अगदीं जरूर तेवढेच ठेवा. बाकीचे सारे परत करा. आतां एडन येईल."

आणि महादेवभाईनीं एडनला तो सारा संभार उतरवला. हिंदला परत पाठवा, तेथील मित्रांना सांगितलें. कमरेला पंचा नेसून दरिद्रनारायणाचा प्रतिनिधि ज्या साम्राज्यावर सूर्य मावळत नसे, त्याच्या राजधानीला गेला.

• • •

## ८६

गोलमेज परिषदेला गांधीजी लंडनला गेले होते. त्या वेळच्या नाना कथा. एके दिवशीं गिल्ड हॉलमध्यें सभा होती. " स्वेच्छापूर्वक घेतलेला दारिद्र्याचा वसा " या विषयावर गांधीजी बोलणार होते. मिस् मॉड रायडन या बाईनीं गांधीजींना आपल्या मोटारींतून सभागृहाकडे नेलें. त्या बाईना डी. डी. पदवी होती.

" डी. डी. म्हणजे काय ? " बापूंनीं मोटारींतून जातांना विचारलें

" डॉक्टरेट ऑफ् डिव्हिनिटी (देवशास्त्रांत पारंगत) असा त्याचा अर्थ. ग्लासगो विद्यापीठानें ती पदवी मला दिली आहे " रायडनबाई म्हणाल्या.

" म्हणजे देवाविषयीं तुम्हांला सारें माहीत आहे एकूण " गांधीजी स्मितपूर्वक म्हणाले. सभागृह आलें.

" सभेनंतर तुमच्याच मोटारींतून मी परत जाईन बरें का " गांधीजी म्हणाले.

त्या बाईंना तो बहुमान वाटला. गांधीजींनीं आपल्या मोटारींतून जावें असें अनेकांना वाटे. जगांतील एक महापुरुष आपल्या मोटारींतून गेला ही केवढा थोर आठवण! अशी आठवण मिळावी म्हणून कोण उत्सुक असणार नाहीं ?

सभा संपली. सभागृहाबाहेर तोबा गर्दी. आणि त्यांतच पाऊस पडत होता. शेंकडों मोटारी तेथें होत्या. त्या बाईंना स्वतःची मोटार पटकन सांपडेना. गांधीजी पावसांत उभे होते. सभोंवतीं अनेक मोटारी. महात्माजींना न्यायला मिळेल म्हणून त्या मोटारी उत्सुकतेनें वाट पहात होत्या. हवेंत मनस्वी गारवा आला. बापूंच्या अंगावर गरम कपडे नव्हते. त्या बाई ओशाळल्या.

" गांधीजी, तुम्ही कोणाच्यातरी गाडींतून जा. माझी गाडी कांहीं सांपडत नाहीं. तुम्ही नका थांबू " रायडनबाई म्हणाल्या.

" परंतु तुमची गाडी सांपडेपर्यंत मी थांबेन " गांधीजी शान्तपणें म्हणाले.

त्या भगिनीला राजमुकुट मिळाल्याचा आनंद झाला. गर्दी कमी झाली. मोटार सांपडली. आणि कबूल केल्याप्रमाणें त्याच मोटारींतून बापू गेले ! त्या भगिनीला केवढें समाधान वाटलें !

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ......... नों. दि .........
वि. ......... क्र. .............

८७

कांहीं महिन्यांपूर्वी जयप्रकाश मद्रास प्रान्ताच्या दौऱ्यावर गेले होते. अलीकडे त्यांच्या पत्नी प्रभावतीदेवीहि छायेप्रमाणें त्यांच्याबरोबर असतात. आणि कन्याकुमारीचें दर्शन घ्यायला दोघें गेलीं. बरोबर मित्र होते. भारताचें तें शेवटचें टोंक. दोन महासागर एकत्र मिसळत आहेत, उसळत आहेत. अरबी समुद्र आणि इकडचा बंगालचा उपसमुद्र दोघे हातात हात घेत आहेत. अति गंभीर नि उदात्त असें तें दर्शन आहे म्हणतात. तेथें एका बाजूला सूर्य मावळतांना दिसतो, तर तिकडे चंद्र वर येतांना दिसतो. पूर्व पश्चिम समुद्रांचें भव्य दर्शन. येथील दृश्य पाहून विवेकानंदांची समाधी लागली होती. गांधीजी येथील दृश्य पाहून भावगंभीर झाले होते. निसर्गाचें सौंदर्य बघायला गांधीजींना वेळ कोठें असे ? परंतु एकदां विलायतेंत जातांना रात्रीच्या वेळेस बोटींतून सागराकडे बघत असतांना त्यांचा फोटो

आहे. दार्जिलिंगजवळ देशबंधूंच्या आजारांत त्यांच्याजवळ ते होते. तेथून हिमालय दिसे नि आपल्या गुजराती नवजीवन पत्रांत त्याचें किती सुंदर वर्णन त्यांनीं केलें होतें. कन्याकुमारी पाहून गांधीजींच्या मनावर विलक्षण परिणाम झाल्याचें सांगतात.

जयप्रकाश व प्रभावती यांनीं तें उदात्त दृश्य पाहिलें. त्या दिवशीं शुक्रवार होता. महात्माजींचा निर्याण–दिन. त्या दिवशीं प्रभावती निराहार असतात. समुद्रस्नान करून त्या आल्या. तें अमर दृश्य पाहून त्या आल्या. आणि खोलींत कातींत बसल्या.

त्याच खोलींत गांधीजींबरोबर पूर्वीं त्या उतरल्या होत्या. गांधीजी ज्या खोलींत राहिले होते, तीच ती खोली. प्रभावतींना शतस्मृति आल्या.

" येथेंच बापू उतरले होते. येथेंच " त्या म्हणाल्या. त्यांना अधिक बोलवेना. बापूंचें स्मरण करीत त्या झोंपी गेल्या.

• • •

## ८८

आज एक करुणगंभीर आठवण तुम्हास सांगणार आहें. १९४३ मधील ते दिवस. ते दिवस कोण विसरेल ? चले जावचा लढा ओसरला होता. जयप्रकाश जेलमधून निसटून पुन्हां

संघटना बांधीत होते. आझाद-दस्ते ठायींठायीं निर्मित होते. आणि गांधीजींचा आगाखान पॅलेसमध्यें उपवास सुरू झाला. सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें. लॉर्ड लिनलिथगो राष्ट्रपित्याला सोडायला तयार नव्हता. तिकडे चर्चिलसारखा कट्टर साम्राज्य-वादी मुख्य प्रधान. गांधीजींची कोण कदर करतो ? मुंबईहून कांहीं व्यक्तींना गांधीजींना भेटायला जातां येत असे. त्यांच्या बरोबर कांहीं बातमी येई.

गांधीजींची प्रकृति गंभीर होती. नाडी नीट नव्हती. डॉक्टर हताश होते. आम्ही महापुरुषाला सक्तीनें अन्न देणार नाहीं, तशी विटंबना करणार नाहीं, असें त्यांनीं सरकारला कळविलें होतें म्हणतात. गांधीजी देवाघरीं गेले तर! सरकारनें तीन दिवसपर्यंत ही बातमी देशाला कळूं द्यायची नाहीं असें निश्चित केल्याचें कळतें. मोक्याच्या ठिकाणीं अधिक लष्कर आणून ठेवण्यांत आलें. वेळप्रसंग आलाच तर सरकारनें चंदनहि गोळा करून ठेवलें होतें म्हणतात.

त्या दिवशीं मुंबईस जयप्रकाश, अच्युतराव वगैरे सचिन्त बसले होते. सरकारनें देशाला बातमी कळूं द्यायची नाहीं असें ठरविलें तरी आपण लाखों पत्रकें काढून जनतेला कळवलें पाहिजे असें कार्यकर्ते म्हणत होते. केव्हां कोणती बातमी येईल काय भरंवसा ?

“ जयप्रकाश, तुम्ही पत्रक लिहून द्या. सर्व भाषांतून त्याचीं भाषान्तरें करायला हवींत. अश्रु पुसा नि लिहा ” अच्युतराव

म्हणाले. मित्र सद्गदित होते. गांधीजी आपणांतून गेले असें समजून लिहायचें. आम्ही ४० कोटि असून त्यांना मुक्त करूं शकलों नाहीं ! केवढी लज्जास्पद गोष्ट ! जयप्रकाशांनीं कागद हातीं घेतला. एक शब्द लिहीत आणि अश्रु गळून तो धुतला जाई. असें तें अश्रूंनीं भिजलेलें पत्रक तयार झालें. मराठींत करायला त्याची एक प्रत मजकडे आली.

परंतु पुन्हां वार्ता आली कीं नाडी सांपडूं लागली. संकट टळलें, राष्ट्रतात जाणार नाहीं. महात्माजींच्या इच्छाशक्तीचा का तो विजय होता ? तो एक चमत्कार होता. स्वराज्य पाहिल्याशिवाय महापुरुष जाणार कसा ? परंतु ती रात्र आठवली कीं अजून हृदय शतस्मृतींनीं भरून येतें.

• • •

८९

त्या आगाखान पॅलेसमधील उपवासाच्या वेळचीच एक गोष्ट. बाहेरच्या लढ्याचें तंत्र गांधीजींना पसंत नव्हतें. गुप्तता त्यांना नको असे. काँग्रेसच्या नांवावर कांहीं होऊं नये अशी इच्छा त्यांनीं प्रदर्शित केली. हें सारें असलें तरी स्वातंत्र्याच्या लढ्याची त्या महापुरुषाला केवढी तहान !

एके दिवशीं आपल्या मनांतील भावना ते बोलून गेले : “ इतक्यांत राष्ट्र कसें थकलें ? इतर राष्ट्रें वर्षानुवर्ष लढत आहेत. भारतानें का इतक्यांत थकावें ? ” असें ते म्हणाले :

एकदां म्हणाले : “ व्हाइसरॉयच्या बंगल्यासमोर जाऊन डोकें आपटून लोकांनीं प्राण द्यावा. अतःपर गुलाम राहणें नको, मरण पत्करलें असें जनतेनें घोषवावें.” पुन्हां म्हणाले : “याला कोणी आत्महत्या म्हणेल. परंतु आत्महत्याहि शूराची असूं शकते. जपानी लोकांच्या हाराकिरीनें जगाला हें दाखविलें आहे.”

महात्माजींचे ते तीव्र शब्द बाहेर आमच्या कानांवर येत. देश स्वतंत्र व्हावा, दास्याची लोकांना चीड यावी म्हणून महात्माजींना किती तीव्रता वाटे तें या उद्गारांवरून दिसून येतें.

० ● ●

## १०

दिल्लीचे ते शेवटचे दिवस. आतां शेवटचे म्हणून म्हणायचें. त्या वेळेस हे दिवस शेवटचे अशी कोणालाच कल्पना नव्हती. एके दिवशीं महात्माजींचे पुत्र देवदास

गांधीजींकडे आले होते. देवदास दिल्लीलाच असत. हिंदुस्तान टाईम्सचे ते संपादक. बहुधा रात्रीं थोडा वेळ ते येऊन जात.

बोलणें वगैरे झालें. नंतर देवदास म्हणाले : "बापू, आज मी प्यारेलालजींना घरीं जेवायला नेणार आहें. नेऊं ना ?"

"ने, ने. खरेंच ने. परंतु काय रे मला जेवायला बोलवायचें कधीं नाहींना मनांत येत ?" बापू बोलले. आणि नंतर मोकळेपणानें हंसले. पितापुत्रांचा गोड विनोद !

• • •

## ११

१९३३-३४ मधील गोष्ट. अस्पृश्यता-निवारणाचा गांधीजींचा दौरा सुरू होता. ओरिसा प्रान्तांतील दौरा नुकताच संपला होता. त्या दौऱ्यांत पुष्कळदां पायींहि हिंडावें लागलें आणि बापू पायीं जात. त्यांना पायीं हिंडणें फार आवडतें. ओरिसांतून आन्ध्र प्रान्तात महापुरुष आला. यात्रा सुरू झाली. सत्यधर्माची अमर वाणी देशबांधवांच्या कानीं पडूं लागली. जागोजाग ही गर्दी. खेड्यापाड्यांतून लाखों लोक येत. महात्म्याचें दर्शन घेत.

हा कोण आला आहे ? मला महात्माजींना भेटूं द्या म्हणत आहे. कोण आहे हा ? काय आहे त्याचें काम ? तो का सनातनी

आहे? तो का वाद करायला आला आहे? परंतु त्याच्या तोंडावर वादप्रेमाची वृत्ति नाहीं. हे निराळेच डोळे आहेत.

"आपलें काय आहे काम" विचारण्यांत आलें.

"क्षणभर भेटूं द्या. मी एक भेट आणली आहे. ती महात्माजींना माझ्या हातांनीं मला देऊं दे. नाहीं नका म्हणूं." त्या पुरुषाचे डोळे ओले झाले. गांधीजींकडे त्यांना नेण्यांत आलें. एका खादीच्या शुभ्र रुमालांत गुंडाळलेलें तें गांधीजींचें चित्र होतें. ती सुंदर तसबीर होती. तो चित्रकार होता. महात्माजींचें चित्र काढून आपले कुंचले त्यानें पावन केले होते.

"महात्माजी, ही तुमची तसबीर मी काढली. ही भेट घ्या" पदकमलाला प्रणाम करून तो म्हणाला. गांधीजींनीं तसबीर हातांत घेतली. पाहिली. ती पुन्हां त्या चित्रकाराच्या हातीं देऊन म्हणाले :

"मी ही कोठें नेऊं? मला घर ना दार. आणखी बोजा कशाला वाढवूं, सामान कशाला वाढवूं? कोठें लावूं ही तसबीर, कोठें ठेवूं? या देहाचेंहि ओझें आतां नको वाटत आहे. गड्या, तुझ्याजवळच ठेव."

सारे गंभीर झाले. महात्माजींचे ते उद्गार आठवून मला तुकारामांचे शब्द आठवतात :

"उद्योगाची धाव बैसली आसनीं । पडलें नारायणीं मोटळें हें"

पुरे आतां धांवपळ. देहाचें मोटळें आतां नारायणाच्या चरणीं पडो म्हणजे झालें!

• • •

## १२

गांधीजी मोठे साक्षेपी पुरुष. त्यांची स्मृति जबरदस्त. शेंकडों हजारों लहान मोठ्या सेवकांची त्यांना आठवण असे. स्मृति हा आध्यात्मिक गुण आहे, सात्त्विक गुण आहे. अर्जुन गीतेच्या शेवटीं म्हणतो : "मोह गेला. स्मृति आली." स्मृति म्हणजे दक्षता. "दक्ष तो मोक्ष मेळवी." बावळटाला, हें विसर तें विसर करणाराला कोठून सिद्धि मिळणार ?

महात्माजी बारडोलीकडून वर्ध्याला जात होते. तापी रेल्वेनें जात होते. अमळनेर स्टेशनावर त्यांना आहार देण्यांत आला. सायंकाळ झाली. गाडी निघाली. एरंडोल रोड स्टेशनहि गेलें. आणि पुढच्या चावलखेडें स्टेशनवर गाडी थांबली. अजुबाजूच्या खेड्यापाड्यांतून शेंकडों शेतकरी जमले होते. गांधीजींच्या डब्याजवळ ते जमले. गांधीजी शान्तपणें खिडकीजवळ बसले होते.

"हरिजनके वास्ते" असें म्हणून त्यांनीं आपला हात पुढें केला. आणि प्रत्येक शेतकऱ्यानें येतांना मुद्दाम बरोबर आणलेला आणा अर्धा आणा राष्ट्रपित्याच्या हातावर ठेवला. प्रत्येकजण ठेवी, प्रणाम करी, दूर होई. गांधीजींना समाधान झालें. गाडी निघाली. शेतकऱ्यांनीं जयजयकार केला. महादेवभाई, प्यारेलाल पैसे मोजीत होते.

" कोणता हा गांव ? " गांधीजींनीं विचारलें.

" एरंडोल जवळचीं हीं सारीं खेडीं. रिक्त हस्तानें कोणी आला नव्हता " कोणी तरी सांगितलें.

" एरंडोल ? बरोबर. शंकरभाऊ काबरे, त्यांचा गांव. शंकरभाऊ, तो निरहंकारी सेवक." एरंडोल म्हणतांच गांधीजींना तेथील शंकरभाऊ आठवले. लगेच त्यांच्या निरहंकारीपणाचा त्यांनीं उल्लेख केला. मी त्या वेळेस डब्यांत होतों. दूरच्या सेवकाविषयींची ती आठवण ऐकून माझें हृदय उचंबळून आलें होतें. सेवकांची अशी कदर करणारालाच सेवकांची वाण पडत नाहीं. उगीच का देशभर हजारों माणसें गांधीजींनीं उभीं केलीं ? ही सहृदय मानवता त्यांच्याजवळ अपरंपार होती.

## १३

गांधीजी नेहमीं म्हणायचे : " मी सर्वांहून अधिक लोकशाहीचा भोक्ता आहे." खरोखरच ते तसे होते. ते कधीं कोणावर कांहीं लादीत नसत. साबरमतीच्या आश्रमांत लहान मुलांजवळ वागतांना सुद्धां त्यांची ही वृत्ति दिसून येई. त्यावेळेस काकासाहेबांचा मुलगा बाळ आश्रमांतच होता. बाळ व त्याचे मित्र यांना साबण हवा होता. कपडे मळले होते.

" गांधीजींची मंजुरी आणा. मग साबणाला पैसे मिळतील " चालक म्हणाले.

ते बालवीर बापूंकडे गेले.

" बापू, तुम्ही मंजुरी द्या."

" परंतु आपणाला गरिबीनें राहायचें. शेतकरीजीवन जगायचें. शेतकरी का रोज कपड्याला साबण लावतो ? तें बरें नाहीं दिसणार " गांधीजी म्हणाले.

" शेतकऱ्यानें का गलिच्छ रहावें ? त्यालाहि साबण मिळेल असें स्वराज्यांत करूं. कामावरून घरीं आल्यावर त्यानेंहि स्वच्छ कपडे घातले पाहिजेत, स्वच्छता म्हणजे का बापू छानछोकी ? स्वच्छता म्हणजे का चैन ? साबण ही आवश्यक वस्तु आहे. तुम्ही मंजुरी द्या."

" मी समजा दिली, परंतु आश्रमांतील सर्वांना ती गोष्ट पसंत न पडली तर ? तुम्ही एक करा. अनुकूल बहुमत मिळवा. अनुकूल सह्या घेऊन या, जा."

" तें आमचें काम " बाळ उडी मारून म्हणाला. आणि त्या बालवीरानीं आश्रमवासीयांच्या भरपूर सह्या मिळविल्या. सर्वांनाच साबण हवा होता. नको कोण म्हणेल ? म्हणजे का गांधीजींना ती मंडळी भीत होती ? परंतु मुलांनीं निर्भय वातावरण आणलें. ते सह्या घेऊन गांधीजींकडे गेले.

" बापूजी, ह्या घ्या सह्या " विजयी वीर म्हणाले.

" साबण मंजूर " बापू हंसून म्हणाले.

• • •

# १४

१९०८ मधील गोष्ट. लोकमान्यांना इकडे सहा वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा झाली होती. आणि तिकडे आफ्रिकेंत महात्माजीहि तुरुंगांत होते. जोहान्सबर्गच्या तुरुंगांत इतर कैद्यांमध्येंच त्यांना ठेवण्यांत आलें. ज्या दिवशीं प्रथम त्यांना कोठडींत ठेवण्यांत आलें त्या दिवशीं त्यांच्या हृदयांत वादळ होतें. त्या कोठडींत दारुड्ये, डाकू, चोर, नाना प्रकारचे कैदी होते. ते वाटेल तें बोलत होते, चावटपणा करीत होते. महात्माजी रात्रभर जागे राहिले. ती रात्र ते कधींहि विसरले नाहींत.

हळुहळु त्यांची वृत्ति शान्त झाली. कैदी-कपडे अंगावर असत. सक्तमजुरीची शिक्षा होती. खडी फोडण्याचें त्यांना काम देण्यांत आलें होतें. एके दिवशीं खडी फोडतां फोडतां त्याच्या हातांतून रक्त येऊं लागलें.

“ बापूजी, पुरे करा काम. बोटांतून रक्त येत आहे ” बरोबरचे सत्याग्रही म्हणाले.

“ जोंवर हात काम करीत राहील तोंवर करीत राहणें हें माझें कर्तव्य ” असें म्हणून तो महान् सत्याग्रही खडी फोडीतच राहिला.

तुरुंगांत असतांना एकदां त्यांना कोर्टांत कसल्या तरी साक्षीसाठीं नेण्यांत आलें होतें. कांहीं मित्र कोर्टांत आले होते.

"मी आनंदी आहें" ते म्हणाले. काम संपताच पोलिस पहाऱ्यांत ते निघाले. युरोपियन मुलें गांधीजींवर प्रेम करणारीं. तीं मागोमाग जात होतीं. परंतु बापूनीं एकदांहि मागें वळून पाहिलें नाहीं. ध्येय-सिद्धीसाठीं पेटवाव्या लागणाऱ्या महान् यज्ञाकडे का त्यांची दृष्टि होती? महात्म्यांच्या मनांतील भाव कोणाला कळणार?

• • •

## १५

महात्माजी राष्ट्राचे तात होते. सारीं त्यांचीं लेकरें. त्यांची कोठें आसक्ति नव्हती. शेवटीं दिल्लीला होते. महात्माजींचे चिरंजीव देवदास भेटावयाला जायचे. देवदासांचा लहान मुलगा गोपू. ते त्यालाहि बरोबर न्यायचे. तीन वर्षांचा गोपू. महात्माजींना त्या बाल गोपाळाचा लळा लागला. तो आला कीं ते त्याला प्रेमानें जवळ घ्यायचे, हास्यविनोद करायचे.

कधीं गोपू बरोबर आला नाहीं तर गांधीजी म्हणायचेः "आज गोपू कां नाहीं आला? तो नाहीं आला तर मला चुकल्या चुकल्यासारखें होतें."

बापू तर निघून गेले. बापूजी लहानग्या गोपूचें ज्या शब्दांनीं स्वागत करायचे त्याचीं हुबेहुब नकल गोपू घरीं करी. आणि देवदास व त्यांची पत्नी यांना रडूं येई.

• • •

IRBK-0105485
IRBK-0105485
म. प्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ५४८५ ता. दि. ........